# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 & Presently a State University governed by Maharashtra Public University Act, 2016 (Maharashtra Act No. VI of 2017)

## Office of the Director Students' Development

डॉ.शैलेंद्र देव
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
मो.नं ९८६०२११७५७

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org
Email : director.dsd@unigug.ac.in


पत्र क्र. No.GUG/DSD /272/2022 Dt: 22 /09/2022

प्रति,

मा. प्राचार्य / मा. विभागप्रमुख
संलग्नित महाविद्यालये,
पदव्युत्तर शैक्षणिक विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय:— माजी कुलपती डॉ. पी. सी. अलेक्झांडर आंतरविद्यापीठीय मराठी वक्तृत्व स्पर्धा २०२२—२३ मध्ये विद्यार्थी सहभागाबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे माजी कुलपती डॉ. पी. सी. अलेक्झांडर आंतरविद्यापीठीय वक्तृत्व स्पर्धा २०२२ आयोजित करण्यात येत आहे. या स्पर्धेची उपांत्य फेरी विद्यार्थी विकास विभागाद्वारे गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे दि. २८ सप्टेंबर २०२२ रोजी बुधवारी दुपारी १२.०० वाजता आयोजीत केली आहे.

उपांत्य फेरीत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड दि. ०७ ऑक्टोंबर, २०२२ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी करण्यात येईल.

तरी आपल्या महाविद्यालयातील तसेच पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी करावे, ही विनंती.

(टिप: रजिस्ट्रेशन करण्याकरिता खाली दिलेल्या लिंकवर क्लिक करावे. रजिस्ट्रेशन करण्याची अंतिम तारीख २६ ऑक्टोंबर २०२२ आहे. स्पर्धेत सहभागी होण्याकरिता स्व:खर्चाने यावे लागेल, याची नोंद घ्यावी.)

लिंक:— https://cutt.ly/MVc9HmR

(डॉ. शैलेंद्र देव) 22.09.22
संचालक (प्र.)
विद्यार्थी विकास विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# : मराठी वक्तृत्त्व स्पर्धेची नियमावली :

१) स्पर्धेचे नाव : माजी कुलपती डॉ. पी. सी. अलेक्झांडर आंतरविद्यापीठीय मराठी/इंग्रजी वक्तृत्त्व स्पर्धा.

२) ही वक्तृत्त्व स्पर्धा महाराष्ट्रातील कृषी व अकृषी विद्यापीठातील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी खुली राहील व ते या स्पर्धेत सहभागी होऊ शकतील.

३) या स्पर्धेसाठी पाच विषय असतील, प्रत्येक स्पर्धकाला त्यांचा विषय अर्धा तास आधी देण्यात येईल.

४) स्पर्धकांचा क्रम मराठी आकारविल्हे याप्रमाणे (Alpabetical) राहील.

५) स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांची निवड करण्याची पद्धत खालीलप्रमाणे :

अ) आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व संलग्न महाविद्यालयातील प्रत्येकी एका विद्यार्थ्यांमधून वक्तृत्त्व स्पर्धेची उपांत्य फेरी घेण्याची जबाबदारी त्या त्या विद्यापीठांवर असेल.

ब) प्रत्येक विद्यापीठाच्या उपांत्य फेरीच्या विजेत्याला अंतिम फेरीसाठी **दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२२** रोजी अंतिम फेरीसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये उपस्थित रहावे लागेल.

क) उपांत्य फेरीमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांस बोलण्यासाठी पाच मिनिटे (४ + १) वेळ देण्यात येईल. चार मिनिटांनंतर पूर्वसूचनेची घंटा वाजविण्यात येईल.

ड) अंतिम फेरीमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांस बोलण्यासाठी सात मिनिटे (५ + २) वेळ देण्यात येईल. पाच मिनिटांनंतर पूर्वसूचनेची घंटा वाजविण्यात येईल.

इ) अंतिम स्पर्धेत गुणानुक्रमे दोन विद्यार्थी निवडले जातील. प्रथम व द्वितीय क्रमांकास अनुक्रमे रू. ५०००/– व रू. २०००/– चे रोख पारितोषिक, तसेच गुणवत्ता प्रमाणपत्र प्रदान करण्यात येतील.

ई) मराठी वक्तृत्त्व स्पर्धेच्या अंतिम फेरीतील प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवी प्रदान समारंभात पारितोषिक व गुणवत्ता प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.